J.O.



# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** विश्राम बाग
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0188 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/06/2025 17:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 25/02/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/02/2025
**Time From (वेळेपासून):** 16:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:51 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/06/2025 **Time (वेळ):** 16:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 023
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/06/2025 16:36 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मार्केट यार्ड सांगली जवळील,ल हटेल देवगिरीच्या समोरील रोड, वसंतदादा पाटील आयुर्वेदिक कले,सांगली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** तानाजी आप्पासो रूईकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बानुगडे गल्ली श्रीसमर्थ रेसीड,ब्राम्हणुपरी, मिरज,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | बानुगडे गल्ली श्रीसमर्थ रेसीड,ब्राम्हणुपरी, मिरज,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9337111777

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | वैभव विजय साबळे | | | 1. ग्रिन एकर्स, फ्लट नं403,, धामणी रोड सांगली,,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दीजबाब दि. 09.06.2025

मी तानाजी आप्पासो रूईकर, वय 45 वर्षे, व्यवसाय - ऑपरेशन मॅनेजर, सी. के. असोसिएट्स, रा. बानुगडे गल्ली, श्री. समर्थ रेसीडन्सी, फ्लॅट नं.101, ब्राOम्हणुपरी, मिरज ता. मिरज जि. सांगली. मो.नं. 9337111777.

मी वरील ठिकाणी माझे आई, वडील, माझी पत्नी व दोन मुली असे एकत्रीत राहण्यास आहे. मी सी के. असोसीएट्स सांगली या आर्किटेक्ट आणि व्हॅल्युअर व्यवसाय करणा-या कंपनीमध्ये दि.22/07/2020 पासून ऑपरेशन मॅनेजर या पदावर काम करीत आहे. या कंपनीचे मालक आर्कि. रविंद्र चव्हाण हे आहेत. माझ्या कामाच्या कार्यविवरणानुसार मला शासकीय, निमशासकीय, नगरपालिका, महानगरपालिका, नगररचना विभाग, महसुल विभाग आणि खाजगी आस्थापना/कार्यालय मध्ये जावून इमारत नकाशे मंजुरीकामी पाठपुरावा करणे, कागदपत्रातील त्रुटींची पुर्तता करणे, नोटीस स्विकारणे, कराचा रोखीने अथवा बँकेमार्फत भरणा करणे इ. अनुषंगीक कामे आणि वेळोवेळी कंपनीकडून सोपविलेल्या जबाबदा-या पार पाडत असतो.

चैतन्य कन्स्ट्रक्शन यांचे मालकीचे सि.स.नं. 27, वखारभाग, आमराई रस्ता या जागेवर "आयरिश ओरिझॉन" या बहुमजली इमारतीचे आरेखन, बांधकाम परवानगी, देखरेख इ. कामासाठी आमचे सी.के. असोसीएट्स या कंपनीला आर्कीटेक्ट म्हणून 4 जुन 2024 मध्ये नेमणुक करून जबाबदारी देण्यात आली होती. त्याप्रमाणे चैतन्य कन्स्ट्रक्शन यांचे मागणीप्रमाणे सदर जागेवर 24 मजली इमारतीचे आरेखन करून त्याचे नकाशे ऑनलाईन पध्दतीने महाराष्ट्र शासनाचे इमारत बांधकामे आणि विकास कामासाठी अधिकृत केलेल्या वेबसाईटवर (building plan management system BPMS) आमचे सी.के. असोसिएट्स या कंपनीमार्फत कंपनीचे लॉगीन आयडी वरून आर्कीटेक्ट रविंद्र चव्हाण यांनी डिजीटल स्वाक्षरी करून बांधकाम परवाना मिळणेकामी दि.26/08/2024 रोजी प्रस्ताव सादर केला होता. त्याचा अर्ज क्र. DDMCM 2400760 असा आहे. तसेच सदर फाईलचा प्रस्ताव क्र. 1467141, दि.19/10/2024 असा आहे. त्यानंतर आम्ही इमारत नकाशे मंजूरी प्रस्तावाची छाननी होणेसाठी महानगरपालिकेची छाननी फी 30,251/- रूपये, पावती क्र.634 दि.19/10/2024 अन्वये ऑनलाईन पध्दतीने सी.के. असोसिएट्स कंपनीच्या खात्यामधून जमा केली होती.

त्यानंतर प्रचलित कार्यालयीन पध्दतीने सदरचा प्रस्ताव शाखा अभियंता यांनी छाननी करून अभिप्रायार्थ नगररचनाकार यांचेकडे पाठविला होता. नगररचनाकार यांच्या अभिप्रायानंतर सदरचा प्रस्ताव पुढील तांत्रिक मान्यतेसाठी सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडे गेला होता. सहा.संचालक नगररचना यांनी त्या प्रस्तावास अंतिम तांत्रिक मान्यता दिल्यानंतर सदरचा प्रस्ताव हा मा.आयुक्त सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांचेकडे दि.28.01.2025 रोजी प्रशासकीय मंजुरीसाठी गेला होता. त्यांनी सदर प्रस्तावावर (TDR/DRC utilization should be through BPMS portal) असा शेरा/त्रुटी मारून दि.29/01/2025 रोजी प्रस्ताव परत पाठविला होता. मी आमचे कंपनी मार्फत घेतलेल्या वरील बांधकाम परवानगी प्रस्ताव मंजुर झाला का? याचा पाठपुरावा करीत होतो. त्यादरम्यान मला महानगरपालिका येथील उप-आयुक्त श्री.वैभव साबळे यांचेशी संपर्क झाला. त्यावेळी मी साबळे, उप-आयुक्त यांचेशी आमचे प्रलंबित बांधकाम परवाना प्रस्तावाबाबत चर्चा केली असता साबळे साहेब यांनी आयुक्त साहेबांशी चर्चा करून सांगतो असे सांगून प्रस्तावाची माहिती मला व्हॉट्सअप नंबरवर पाठविण्यास सांगितली होती. त्याप्रमाणे मी दि.30/01/2025 रोजी सदर प्रस्तावातील इमारत नकाशा आणि त्यामध्ये असणारी दुकाने, ऑफीस आणि फ्लॅट यांची संख्या उप-आयुक्त श्री. वैभव साबळे यांचा मोबाईल क्रमांक 9766799390 वर व्हॉट्सअपव्दारे पाठविली होती.

त्यानंतर आम्ही दि.02/02/2025 रोजी आमचे प्रस्तावामध्ये असणा-या त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव पुन्हा मा. आयुक्त यांचे लॉगीनला दाखल केला होता. त्यानंतर दि.03/02/2025 रोजी मी उप आयुक्त वैभव साबळे यांच्या



Scanned with OKEN Scanner

मोबाईलवर संपर्क साधला असता त्यांनी प्रस्ताव आयुक्त साहेबांचेकडे गेला का ? म्हणून विचारणा केली असता मी त्यांना प्रस्ताव आयुक्त साहेबांचेकडे गेला असल्याचे सांगितले. त्यावेळी साबळे साहेब यांनी आयुक्त साहेबांशी चर्चा करून निरोप देतो असे सांगितले होते. त्यानंतर दि.04/02/2025 रोजी मी माझ्या मोबाईल क्र.9337111777 वरून सदरचा प्रस्ताव आयुक्तांकडे प्रलंबित असलेचा BPMS या वेबसाईटवरील पानाचा स्क्रिनशॉट उप-आयुक्त श्री. वैभव साबळे यांचे वर नमूद व्हॉट्सअप नंबर पाठविला होता.

त्यानंतर मी वरील बांधकाम परवानगी प्रस्ताव मंजुर झाला का नाही याची खात्री करण्यासाठी दि.11/02/2025 रोजी महानगरपालिका कार्यालयात जावून श्री.वैभव साबळे, उप-आयुक्त यांची भेट घेतली असता श्री. वैभव साबळे यांनी आमचे बांधकाम परवानगी प्रस्ताव आयुक्त साहेब यांना सांगून मंजुर करण्यासाठी माझ्याकडे 10 लाख रूपयांची मागणी केली. त्यावेळी मी सी.के. असोसिएट्स चे मालक आर्कि. रविंद्र चव्हाण यांचेशी सदरबाबत चर्चा केली असता त्यांनी मला वैभव साबळे, उप-आयुक्त यांनी लाच मागणी केलेबाबतची तक्रार अँन्टी करप्शन कार्यालय येथे जावून करण्यास सांगितली होती.

आमचे साईट्सवरील बांधकाम परवाना मंजुर करण्यासाठी श्री.वैभव साबळे, उप-आयुक्त यांनी माझ्याकडे 10,00,000/- रूपये लाचेची मागणी केली असून श्री.वैभव साबळे, उप-आयुक्त यांना पैसे दिल्या शिवाय ते आमचे बांधकाम परवाना प्रस्ताव आयुक्त साहेब यांना सांगून मंजुर करणार नाहीत याची मला खात्री आहे. मला श्री.साबळे, उप-आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.17.02.2024 रोजी सकाळी 10.08 वा चे सुमारास पोलीस उप अधीक्षक श्री. उमेश पाटील, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांना फोनव्दारे संपर्क करून माझी श्री. साबळे, उप-आयुक्त यांचेविरूध्द लाच मागणीबाबतची तक्रार कळविली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला सांगली बायपास रोड येथील वृंदावन मंगल कार्यालय येथे 11.00 वा हजर राहणेच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे मी बायपास रोड येथील वृंदावन मंगल कार्यालय येथे 11.00 वा चे सुमारास माझेकडील हुंडाई व्हेन्यु कार क्र. एमएच 10 डीएल 7771 मधून जावून पोलीस उप अधीक्षक श्री. उमेश पाटील, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांची भेट घेतली. त्यानंतर पाटील साहेब यांचे सुचनेप्रमाणे दोन पंच त्यांचेकडील टाटा पंच कार क्र. एमएच 09 जी एम 6228 मधून पाटील साहेब यांचे समक्ष हजर झालेत.

त्यानंतर पाटील साहेब यांनी स्वत:ची तसेच दोन्ही पंचांची व सापळा पथकाची माझेशी ओळख करून दिली. त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचांना देखील कथन केली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीची माहिती देवून मला तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझा श्री. साबळे, उप-आयुक्त यांचेविरूध्दचा लाच मागणीचा टंकलिखीत तक्रारी अर्ज पाटील साहेबांचे समक्ष हजर केला. मी दिले तक्रारी अर्जावर पाटील साहेब यांनी वाचून सही केली. त्यानंतर पाटील साहेब यांनी सदर कारवाईसाठी श्री. विशाल बबन कांबळे यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री.प्रज्योत मारूतीराव पाटील यांनी पंच नं. 2 म्हणुन काम करण्याचे ठरवले. त्यानंतर पाटील साहेब यांनी दोन्ही पंचांना माझा तक्रारी अर्ज वाचण्यास दिला. त्यानंतर दोन्ही पंचांनी मी तोंडी सांगितलेली तक्रार व तक्रारी अर्जातील मजकूर एकच असल्याचे सांगून तक्रारी अर्जावर सहया केल्या. त्यानंतर पाटील साहेब व पंचांसमक्ष आमचे बांधकाम परवाना प्रस्तावाची ऑनलाईन सादर केलेली बी.पी.एम.एस. रिपोर्टची प्रिंट व साबळे साहेब यांना व्हॉट्सअप केलेले मेसेजचे स्क्रिनशॉटची प्रिंट हजर केली. त्यावर पाटील साहेब व दोन्ही पंचांनी सह्या केल्या.त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 कांबळे यांना श्री. साबळे, उप-आयुक्त, यांचेकडे सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका येथे पाठवून त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती देवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 कांबळे यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 11.33 वा सुरु करून रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवून आम्हाला रवाना करून पडताळणी केली असता, साबळे साहेब हे महानगरपालिका कार्यालयामध्ये हजर नसल्याने त्यांचेशी आमची भेट झाली नसल्याचे निष्पन्न झाले. तसेच मी साबळे साहेब यांना कॉल केला असता त्यांनी माझा कॉल देखील स्विकारला नाही. त्यानंतर आम्ही सर्व साबळे, उप-आयुक्त यांचा फोन येण्याची वाट पाहण्याचे निश्चित करून आम्ही सर्व बायपास रोड येथील वृंदावन मंगल कार्यालय येथे थांबून राहिलो. त्यानंतर 17.25 वा चे सुमारास मी पाटील साहेब यांना साबळे, उप-आयुक्त यांचा फोन कॉल येत असल्याचे सांगितले. त्यावेळी पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी साबळे साहेब यांचा कॉल स्विकारून फोन स्पिकर मोडवर घेतला असता साबळे साहेब यांनी मला ते ऑफीसला गेलेनंतर फोन करीत असल्याचे सांगितले. सदरचा कॉल पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केला. त्यानंतर आम्ही साबळे, उप-आयुक्त यांचा मला फोन येण्याची वाट पाहिली. परंतू साबळे साहेब यांचा फोन न आल्याने पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 कांबळे



Scanned with OKEN Scanner

यांना साबळे, उप-आयुक्त यांचेकडे सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका येथे पुन्हा पाठवून पडताळणी करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 कांबळे यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 18.35 वाजता सुरू करून रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 कांबळे असे वृंदावन मंगल कार्यालय येथून माझेकडील कार मधून रवाना होवून महानगरपालिका येथे दाखल झालो. त्यावेळी मी व पंच नं.1 कांबळे असे श्री.साबळे उप-आयुक्त यांचे केबीनमध्ये गेलो. त्यावेळी साबळे साहेब यांचे समोर एक इसम बोलत बसला होता. त्यानंतर सदर इसम हा निघून गेलेने मी साबळे साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी साबळे साहेब यांनी मला "झालेय बोलण... फाईल पन उघडून बघीतली त्यांनी...... त्यांची क्युरी आहे की तेवीस मजल्याच्या ह्याला... ते आपले... टी टी एम एम प्लॅट फॉर्म नाय ए ना ?............मोठी शिडी नाय ए ना? ती असल्याशिवाय तेवीस मजल्याच्या इमारतीला परवानगी देता येत नाय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "मिरजेत दिले की" असे म्हणालो. त्यावेळी साबळे यांनी पंच नं.1 कांबळे यांना हाताने इशारा करून बाहेर थांबण्यास सांगितले असता पंच कांबळे हे केबीनच्या बाहेर गेले. त्यानंतर साबळे साहेब यांनी "मला माहितेय...मी बोललो त्यांना....ते म्हणाले जरा त्याचेवर कायतरी मार्ग काढा.... कारण आता आपली फायर एन ओ सी दिलेय... ती पण त्याच बेसीसवर दिलेली आहे.....की ती मशीन अ...येण्याच्या ह्याच्यावर ओ सी, ओ सी तेव्हा द्यावी की जेव्हा ती मशीन येईल." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "चालेल की, मला काय प्रॉब्लेम नाय" असे म्हणालो. त्यावर साबळे साहेब यांनी "फायनल एन ओ सी ही त्या फायर मशिन येण्याच्या बेसेसवर दिली असल्याचे सांगितले. त्यावर मी त्यांना "ते आता प्रोसेसचा भाग हाय... एकदा परिमशन द्या... कन्स्ट्रक्शन चालु झाल की त्या गोष्टी होवून जातील ना" असे म्हणालो. त्यावर साबळे साहेब यांनी "त्यांचे म्हणण हाय, तस देता येणार नाय... काय तरी मार्ग सुचवा त्याच्यामध्ये" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "कुणाकडन मार्गदर्शन घ्यायच मग" असे विचारले असता साबळे यांनी मला "चव्हाण सरांना फोन लावण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझे मोबाईलवरून श्री. रविंद्र चव्हाण सर यांचे मोबाईल नंबर 9422407053 वर फोन करून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी मी चव्हाण सरांना "सर, नमस्ते.... साबळे साहेबांचेकडे आलतो....एक क्युरी सांगितले त्यांनी असे म्हणून फोन साबळे साहेबांचेकडे दिला. त्यावेळी साबळे साहेब यांनी माझेकडील फोन घेवून चव्हाण सरांशी बोलू लागले. त्यावेळी साबळे यांनी चव्हाण सरांना "सर नमस्ते... आताच बोलणे झाल... सरांना सांगितले सिरीयसनेस सगळा.... फक्त त्यांची एकच क्युरी आहे की, तेवीस मजल्यापर्यंत द्यायला आपल्याला.... टी टी एम एफ चा प्लॅट फॉर्म लागतोय ना आपल्याला.. एक्स्ट्रा हाईटची लायरन लागते ना." असे म्हणाले. त्यावर चव्हाण सरांनी "नाय सर...ह्याच्या अगोदर झाले ना ते...... त्याच्यातून जर फायरची मशीन फिरत असेल तर रिलॅक्सेशन आहे" असे म्हणाले. त्यावर साबळे यांनी त्यांना "आहे काय तस? मला प्रोव्हीजन पाठवता सर,.. मी आजच करून घेतो" असे म्हणाले. त्यावर चव्हाण सरांनी फायर एन ओ सी मध्ये दिली असल्याचे सांगितले. त्यावर साबळे यांनी "फायर एन ओ सी मध्ये तस दिलेले आहे... की त्यात क्लीअर लिहलेल आहे......ओ सी, टी टी एम एम चा प्लॉट फॉर्म येईल त्या कंडीशनवर ओ सी देण्यात यावी...... मी माझेकडन करतोय सर प्रयत्न... मला फक्त तेवढ एक राहिलेल डॉक्युमेंट दिल तर काय आडचण येणार नाय.." असे म्हणाले. त्यावर चव्हाण सरांनी "चालेल" असे म्हणून फोन कट केला.

त्यानंतर माझेत व साबळे साहेब यांचेमध्ये फायर एन ओ सी संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी साबळे साहेब यांनी मला "एकदा फक्त सरांना बघून काढू द्या...जर मार्ग निघालाच तर वेल अँण्ड गुड, विषय संपुन जाईल.....नाय निघाला तर परत बघू" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "काढा म्हणाव काय तर मार्ग.... काय तर करा." असे म्हणालो. त्यावर साबळे साहेब यांनी "एकदा सरांना विचारून बघा, काय निघालाच लिगल मार्ग तर... नाय तर मग उद्या मी स्पष्ट बोलतो..... तुमच तुम्ही बघून घ्या" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना उद्या परवा पण आम्ही नसल्याचे सांगितले. त्यावर साबळे साहेब यांनी "असुदे, तुम्ही असला नसला तर मी करून घेतो" असे म्हणून "कळवतो मी....झाले की लगेच कळवतो.....सरांच काय आले तर मला डायरेक्ट फोन करायला लावला तर चालेल" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "ठिक आहे....येवू मग" असे बोलून मी व पंच नं.1 कांबळे तेथून रवाना होवून पाटील साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 19.15 वाजता काढून घेवून बंद केला.

त्यानंतर पाटील साहेबांनी मला व पंच नं.1 विशाल कांबळे यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुन झालेल्या संभाषणाची पंचांसमक्ष खात्री केली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला साबळे, उप-आयुक्त यांनी सांगितलेल्या बांधकाम परवान्यामधील क्युरीबाबतचा पुर्तता झालेनंतर पुन्हा श्री. साबळे, उप-आयुक्त यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब



Scanned with OKEN Scanner

यांनी मला साबळे, उप-आयुक्त यांनी संपर्क केल्यास तात्काळ त्यांना संपर्क करण्याबाबत व कारवाई बाबत गोपनीयता राखण्याच्या सुचना देऊन त्यांना जाण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी निघून गेलो.

त्यानंतर मी दोन-तीन दिवस बाहेर गावी गेलो असल्याने दि.20.02.2025 रोजी साबळे साहेब यांनी सांगितेप्रमाणे त्यांचे व्हॉट्सअप नंबरवरती फायर प्रोटेक्शन प्रोव्हीजनची पीडीएफ फाईल पाठविली होती.

दि. 25.02.2025 रोजी श्री. साबळे, उप-आयुक्त यांचा माझे मोबाईलवर व्हॅाट्सअ कॉल येत असल्याने मी लागलीच 15.30 वा चे सुमारास पोलीस उप अधीक्षक पाटील साहेब यांना संपर्क करून त्यांना हकीकत सांगितली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला लागलीच बायपास रोड येथील वंृदावन गार्डन मंगल कार्यालय, सांगली येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी 16.00 वा चे सुमारास वंृदावन गार्डन मंगल कार्यालय, सांगली येथे जावून पाटील साहेब यांची व सापळा पथकाची भेट घेतली. त्यावेळी मी पाटील साहेब यांना दोन्ही पंचांसमक्ष श्री. साबळे, उप-आयुक्त यांचा दोन वेळा व्हॉट्सअप कॉल येवून गेला असलेबाबतची हकीकत सांगितली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी माझे मोबाईलवरुन श्री. साबळे, उप-आयुक्त यांचे मोबाईलवर व्हॉट्सअप कॉल करून त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती देवून त्यामध्ये एक नविन मेमरी कार्ड घातले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचनेवरून मी माझे मोबाईल नंबर 9337111777 वरून श्री. साबळे साहेब यांचे मोबाईल नंबर 9766799390 वर 16.08 वाजता व्हॉट्सअप कॉल केला असता श्री. साबळे साहेब यांनी माझा कॉल स्विकारला नाही. त्यानंतर मी पाटील साहेब यांना माझे मोबाईलवर श्री. साबळे साहेब यांचा व्हॉट्असप कॉल येत असलेबाबत सांगितले. त्यावेळी पाटील साहेब यांनी दिले सुचनेवरुन मी श्री.साबळे यांचा व्हॉट्सअप कॉल स्विकारून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.09 वाजता सुरु करून माझे समोर धरला. त्यावेळी मी त्यांना "साबळे साहेब नमस्ते...बोला की" असे म्हणालो. त्यावर साबळे साहेब यांनी हा दादा....कुठाय? असे विचारले असता मी त्यांना ऑफीसला असल्याचे सांगितले. त्यानंतर माझेत व साबळे साहेब यांचेमध्ये "सांगली मिरज रोड वरील मार्केड यार्ड सांगली जवळील द जिम येथील देवगिरी हॉटेल" येथे भेटण्या संदर्भात चर्चा झाली. त्यानंतर आमचेतील बोलणे झालेनंतर मी कॉल कट केला. लागलीच पाटील साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केला.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाई मध्ये, श्री. साबळे, उप-आयुक्त यांनी मला द जिम येथील देवगिरी हॉटेल येथे भेटण्यास बोलविले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 कांबळे यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.24 वाजता सुरु करुन रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवून रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच नं.1 कांबळे असे माझेकडील हुंडाई व्हेन्यु कार क्र. एमएच 10 डीएल 7771 मधून रवाना झालो. त्यावेळी मला साबळे साहेब यांचा फोन आल्याने मी त्यांचा फोन स्विकारुन लाऊड स्पिकर ऑन केला. त्यावेळी साबळे यांनी मला "किती वेळ लागेल" असे विचारले असता मी त्यांना गाडीचा स्टार्टर मारला असून लगेच येत असलेबाबत सांगून फोन कट केला. त्यानंतर मी व पंच नं.1 कांबळे असे लागलीच सांगली ते मिरज रोडकडे जाणारे रोडने मार्केट यार्ड सांगली जवळील वसंतदादा पाटील आयुर्वेदिक कॉलेजकडे जाणारे रोड येथील देवगिरी हॉटेल समोरील रोडलगत दाखल झालो. त्यावेळी श्री. साबळे हे त्यांचेकडील पांढ-या रंगाचे स्विफ्ट कार मध्ये पाठीमागील सिटवर बसलेचे दिसले. त्यावेळी गाडीमध्ये त्यांचा ड्रायव्हर देखील होता. त्यावेळी मी माझी कार श्री.साबळे साहेब यांचे कारचे साईडला पार्क केली. त्यानंतर मी व पंच नं.1 असे आमचेकडील कार मधून उतरुन श्री. साबळे यांचे कार जवळ गेलो. त्यावेळी श्री. साबळे उप-आयुक्त यांनी पंच नं.1 कांबळे यांना हाताने इशारा करून कारच्या बाहेर थांबण्यास सांगून मला कारमध्ये घेतले. तसेच त्यांनी त्यांचे ड्रायव्हरला देखील खुणवून कारचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यावेळी साबळे साहेब यांचे कारच्या काचा ह्या पुर्ण उघडया होत्या. त्यावेळी मी व श्री. साबळे, उप-आयुक्त असे त्यांचे कारमध्ये पाठीमागील सिटवर बसून चर्चा करु लागलो. त्यावेळी श्री.साबळे, उप-आयुक्त यांनी मला "एक इतक्या दिवसांनी तुम्ही काम सांगितलय......त्यांना केलेय कन्व्हेन्स.....ते म्हणले तस करून, करून टाकुया फायनल" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "चालतय की झाल की बर होईल राव" असे म्हणालो. त्यावेळी साबळे साहेब यांनी मला त्यांचेकडील मोबाईलवर "दहा" असा आकडा टाईप करून दाखवून "एवढ सांगितलय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "किती ?......दहा लाख?" असे विचारले असता साबळे साहेब यांनी मान डोलावून होकार दिला. त्यावर मी साबळे साहेब यांना रक्कम कमी करणेची विनंती केली असता साबळे साहेब यांनी मला "त्यांच्याकडन जो निरोप आला... तो मला सांगायच काम आहे पुढ.... सांगा पुढ कस सांगू?" असे विचारले असता मी त्यांना "पाच लाखा पर्यंत करा म्हणाव की? असे म्हणालो. त्यावर साबळे साहेब यांनी "ठिक आहे, बघुया... पाच पर्यंत एैकतील नाय एैकतील माहित नाय..... बोलून बघतो" असे म्हणून "लास्ट किती पर्यंत सांगू ? असे मला



Scanned with OKEN Scanner

विचारले असता मी त्यांना "सात पर्यंत" असे म्हणालो. त्यावर साबळे साहेब यांनी "करून टाकू..... तुम्ही आहे तो पर्यंत, मी त्यांना बोलतो... मी त्यांना कनव्हेन्स करायचा प्रयत्न करतो" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "कधी पर्यंत व्यवस्था करू?" असे विचारले असता साबळे साहेब यांनी "तेवढे अपलोड करा... या एक दोन-तीन दिवसातच संपवून टाकू विषय" असे म्हणाले. त्यावेळी साबळे साहेब यांचे कारच्या काचा ह्या पुर्ण उघडया असल्यामुळे पंच नं. 1 कांबळे यांनी माझे व साबळे साहेब यांचेतील बोलणे ऐकले व पाहिले आहे. त्यानंतर आमचेतील चर्चा झालेनंतर मी व पंच नं.1 कांबळे असे तेथून आमचेकडील कारने रवाना होवून पाटील साहेब व सापळा पथक यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.51 वाजता काढून घेवून बंद केला.

त्यानंतर पाटील साहेबांनी मला व पंच नं.1 विशाल कांबळे यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुन झालेल्या संभाषणाची पंचासमक्ष खात्री केली.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये, श्री. साबळे, उप-आयुक्त यांनी आमचे 24 मजल्याच्या इमारतीचा बांधकाम परवाना वरिष्ठांना सांगून मंजुर करण्याकरीता स्वत: करीता माझेकडे 10,00,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 7,00,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. तसेच श्री. साबळे यांनी मला बांधकाम परवान्यातील क्युरी मधील डॉक्युमेंट अपलोड करण्यास सांगून "साहेबांना कन्व्हेन्स करण्याचा प्रयत्न करीत" असल्याचे सांगून दोन-तिन दिवसात विषय संपवून टाकू असे म्हणालेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला श्री. साबळे यांनी त्यांचे बांधकाम परवान्या मधील सांगितलेली फाईल अपलोड करण्यास सांगून श्री.साबळे उप-आयुक्त यांनी मागितलेप्रमाणे 7,00,000/- लाचेची रक्कम दोन-तिन दिवसांमध्ये उपलब्ध होईल का? याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना 7,00,000/- रूपये रक्कम जास्त असल्याने सदरची रक्कम उपलब्ध करणेसाठी थोडा वेळ लागणार असल्याचे सांगितले. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला श्री. साबळे, उप-आयुक्त यांनी मागिल्याप्रमाणे लाच रक्कम उपलब्ध झाल्यानंतर त्यांना संपर्क साधणेबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर मी, माझेत व श्री. साबळे यांचेत झालेले व्हॉट्सअप कॉलचे स्क्रिनशॉट काढून पाटील साहेब यांचे व्हॉट्सअप नंबरवर पाठविले.त्यानंतर पाटील साहेब यांनी मला साबळे, उप-आयुक्त यांनी संपर्क केल्यास तात्काळ त्यांना संपर्क करण्याबाबत व कारवाई बाबत गोपनीयता राखण्याच्या सुचना देऊन त्यांना जाण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी निघून गेलो.

त्यानंतर दि.26.02.2025 रोजी मी साबळे साहेब यांनी सांगितलेप्रमाणे बांधकाम परवान्यामधील प्रतिज्ञापत्र महानगरपालिका यांचे वेबसाईटला ऑनलाईन सादर केले होते. तसेच मी साबळे साहेब यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांना द्यावी लागणारी लाच रक्कम 7 लाख रूपये याची देखील व्यवस्था करीत होतो.

दि.07.03.2025 रोजी 15.50 वा चे सुमारास पाटील साहेब यांनी मला संपर्क करून लोकसेवक श्री. साबळे उप आयुक्त यांनी सांगितलेली डॉक्युमेंट अपलोड केली का? व त्यांनी मागितलेप्रमाणे लाच म्हणून द्यावी लागणारी रक्कम 7 लाख रूपये उपलब्ध झाली का? याबाबत विचारणा केली असता मी त्यांना डॉक्युमेंट ऑनलाईन अपलोड केले असल्याचे सांगून रक्कम 5 लाख रूपयेच उपलब्ध झाली असल्याचे सांगितले. त्यावेळी पाटील साहेब यांनी साबळे यांचा मला कोणताही निरोप व फोन न आल्याने माझे मोबाईलवरून श्री. साबळे, उप आयुक्त यांना संपर्क करून श्री. साबळे उप-आयुक्त व त्याचे साहेब यांचेमध्ये चर्चा झाली आहे अगर कसे? तसेच लाच रक्कम कधी व कोठे द्यावयाची आहे याबाबत साबळे यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला 17.00 वाजता वृंदावन गार्डन मंगल कार्यालय, सांगली येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी 17.15 वा चे सुमारास माझे कार मधून वृंदावन गार्डन मंगल कार्यालय, सांगली येथे जावून पाटील साहेब व सापळा पथकाची भेट घेतली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी माझे मोबाईलवरून श्री. साबळे यांचे मोबाईलवर व्हॉट्सअप कॉल करून त्यांचेकडे पडताळणी कारवाई करण्याचे निश्चित करून मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती देवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले. त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 9337111777 वरून श्री. साबळे यांचे मोबाईल नंबर 9766799390 वर व्हॉट्सअप कॉल करून पडताळणी केली असता पडताळणी कारवाईमध्ये, श्री. साबळे, उप-आयुक्त यांनी मला आमचे प्रलंबित कामाबाबत आयुक्त साहेबांना निरोप दिला असल्याचे सांगून साहेब हे फाईल संध्याकाळ पर्यंत अँप्रुव्ह करीत असल्याचे सांगून भेटण्याचे कळवित असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी सर्वानुमते गोपनियतेच्या दृष्टीने व पुढील कारवाई सोयीचे जावी म्हणून आम्ही सर्व आमचेकडील वाहनाने वृंदावन मंगल कार्यालय सांगली येथून रवाना होवून राममंदीर चौक सांगली जवळील त्रिकोणी बाग सांगली येथे सुरक्षित ठिकाणी दाखल झालो. त्यानंतर आम्ही सर्व त्रिकोणी बाग, सांगली येथे बराच वेळ थांबून



Scanned with OKEN Scanner

राहून श्री.साबळे, उप-आयुक्त यांचा मला फोन येण्याची वाट बघीतली. परंतू श्री. साबळे साहेब यांचा मला फोन न आल्याने पाटील साहेब यांनी पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित केली.

त्यानंतर श्री. साबळे, उप-आयुक्त यांचे लाच मागणीमध्ये आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांचा सहभाग आहे अगर कसे? हे निश्चित करण्यासाठी आयुक्त यांचेकडे कार्यालयीन सुट्या असल्याने पुढील आठवडयामध्ये त्यांचेकडे पडताळणी करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. त्यानंतर मी, माझेत व श्री. साबळे यांचेत झालेले व्हॉट्सअप कॉलचे स्क्रिनशॉट काढून पाटील साहेब यांचे व्हॉट्सअप नंबरवर पाठविले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला श्री. साबळे, उप-आयुक्त यांनी संपर्क केल्यास तात्काळ त्यांना संपर्क करणेबाबत सुचना देवून कारवाई बाबत गोपनियता राखणेबाबत सुचना देवून जाणेस सांगितले. त्याप्रमाणे मी निघून गेलो.

दि. 11.03.2025 रोजी सकाळी 09.50 वा चे सुमारास पाटील साहेब यांनी मला संपर्क करून 11.00 वा पर्यंत बायपास रोड येथील वंदृावन मंगल कार्यालय येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी 11.05 वा चे सुमारास मी माझेकडील कारने पाटील साहेब व सापळा पथकाची वंृदावन गार्डन मंगल कार्यालय, सांगली येथे जावून भेट घेतली.

त्यानंतर आम्हा सर्वानुमते श्री. साबळे, उप-आयुक्त यांचे लाच मागणीमध्ये आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांचा सहभाग निश्चित करण्यासाठी त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती देवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 कांबळे यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.14 वाजता सुरु करून रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवून आम्हाला रवाना करून पडताळणी केली असता, त्यामध्ये आमची आयुक्त साहेब यांचेशी भेट झाली नसून त्यांनी मला दुपारी 03.00 वा नंतर भेटण्यास बोलविले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी दुपारी 03.00 वा नंतर मला व पंच नं.1 कांबळे यांना श्री. गुप्ता, आयुक्त यांचेकडे पाठवून पडताळणी कारवाई केली असता त्यामध्ये, मी व पंच नं.1 कांबळे असे महानगरपालिका येथे गेलो असता कार्यालयाचे मेन गेटजवळ आम्हाला साबळे साहेब भेटले. त्यावेळी साबळे साहेब यांनी मला बाजूस घेवून "काल अनुपला फोन करायला लावलेला, तुमच काय बोलण झाल न्हाय वाटतं" असे म्हणून "मी माणुस पाठवतो आज..... मी जरा बाहेर चाललोय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "ठिक हाय मी फोन करतो" असे म्हणालेने साबळे साहेब हे निघून गेले. त्यानंतर मी व पंच नं.1 असे दुसऱ्या मजल्यावरील आयुक्त साहेबांचे कक्षामध्ये जावून त्यांची भेट घेतली. त्यावेळी तत्कालीन आयुक्त, सां.मि.कु. मनपा यांनी माझेशी प्रलंबित कामाबाबत चर्चा करून माझेकडे कोणत्याही प्रकारची लाचेची मागणी केली नसल्याचे निष्पन्न झाले.

तसेच साबळे, उप आयुक्त यांनी मला अनुप पाटील यांस सांगितले असून तो अगर इतर कोणास तरी आजच त्यांची भेट घेण्यास पाठवित असल्याचे निष्पन्न झालेने साबळे साहेब हे माझेकडे कोणास तरी पाठवून त्याचे मार्फत माझ्याकडून लाच रक्कम स्विकारणार असल्याची शक्यता वाटत असल्याने पाटील साहेब यांनी मला लाच रक्कम हजर करण्यास सांगितली असता मी त्यांना माझ्याकडे 5 लाख रूपयेच उपलब्ध झाले असल्याचे सांगून रक्कम ही आमचे ऑफीसमध्ये असल्याची सांगितली. त्यावेळी पाटील साहेब यांनी लाच रक्कमेतील उर्वरित रूपये 2 लाख रक्कमेच्या डमी नोटा वापरू असे मला सांगून आमचे ऑफीसमधून मला 5 लाख रूपये घेवून येण्यास सांगितले असता मी लागलीच माझेकडील कारने रवाना होवून आमचे ऑफीसमधून 5 लाख रूपये घेवून येवून पाटील साहेब यांचेसमक्ष हजर झालो. त्यावेळी मी माझेकडील एकुण 10 बंडल त्यामधील प्रत्येक बंडल मध्ये 50,000/- रूपये प्रमाणे 500/- रूपये दराच्या अशा एकुण 1000 नोटा असे 5,00,000/- रूपये पंचासमक्ष हजर केल्या.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मी हजर केलेल्या 5,00,000/- रूपये व त्यांचेकडील 500/- रूपये दराचे डमी नोटा 2,00,000/- रूपये असे एकुण 7,00,000/- रूपये वापरण्याचे निश्चित केले. त्यानंतर मी हजर केलेले 500/- रूपये दराच्या 1000 नोटांचे नंबर पाटील साहेब, दोन्ही पंचांनी व सापळा पथकातील कर्मचारी यांनी कोऱ्या कागदावर लिहून घेवून त्यावर पाटील साहेब व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर आम्ही सर्व वृंदावन मंगल कार्यालय येथे थांबून राहून बराच वेळ श्री. साबळे यांचा कॉल येण्याची वाट पाहिली, परंतू त्यांचा कॉल न आल्याने माझे मोबाईलवरून श्री. साबळे यांचे मोबाईलवर व्हॉट्सअप कॉल करून पडताळणी कारवाई केली असता त्यामध्ये साबळे यांनी मला फोन करून आजच कळवित असल्याचे निष्पन्न झाल्याने पाटील साहेब यांनी साबळे उप-आयुक्त यांचा मला फोन आल्यानंतर त्यांचेविरूध्द पुढील कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी सर्वानुमते गोपनियतेच्या व सापळा कारवाईच्या दृष्टीने वंृदावन मंगल कार्यालय येथून 18.50 वा चे सुमारास रवाना होवून 19.10 वा चे सुमारास उद्योग भवन विश्रामबाग सांगली येथील



Scanned with OKEN Scanner

सरस्वतीनगर स्पोर्ट्स ग्राऊंड येथे सुरक्षित ठिकाणी दाखल झालो. त्यानंतर पाटील साहेब यांनी श्री. साबळे, उप-आयुक्त यांचा मला फोन आल्यानंतर पुढील सापळा पुर्व कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर आम्ही बराच वेळ श्री. साबळे, उप आयुक्त यांचा फोन येण्याची वाट पाहिली. परंतू त्यांचा फोन न आल्याने पाटील साहेब यांनी माझे मोबाईलवरून त्यांना पुन्हा व्हॉट्सअप कॉल करून लाच रक्कम कोणाला, कधी व कुठे द्यायची याबाबतची पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 9337111777 वरून श्री. साबळे यांचे मोबाईल नंबर 9766799390 वर सायंकाळी 07.47 व 08.02 वाजता दोन वेळा व्हॉट्सअप कॉल केला असता साबळे साहेब यांनी माझा कॉल स्विकारला नाही.

त्यानंतर आम्ही सर्व सरस्वतीनगर स्पोर्ट्स ग्राऊंड येथे बराच वेळ थांबून राहून श्री.साबळे, उप-आयुक्त यांचा फोन येण्याची वाट बघीतली. परंतू श्री. साबळे साहेब यांचा फोन न आल्याने पाटील साहेब यांनी सदर दिवशीची कारवाई तात्पुरती स्थगित केली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला श्री. साबळे, उप-आयुक्त यांचा फोन अगर निरोप आल्यानंतर त्यांचेविरूध्द पडताळणी व सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करून मी हजर केलेली लाच रक्कम 5,00,000/- रूपये, डमी नोटा 2,00,000/- रूपये व नोटांचे नंबर्स लिहिलेले कागद पाटील साहेब यांनी त्यांचे ताबेत घेतलेत. त्यानंतर मी, माझेत व श्री. साबळे यांचेत झालेले व्हॉट्सअप कॉलचे स्क्रिनशॉट काढून पाटील साहेब यांचे व्हॉट्सअप नंबरवर पाठविले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला श्री. साबळे, उप-आयुक्त यांनी संपर्क केल्यास तात्काळ त्यांना संपर्क करणेबाबत सुचना देवून कारवाई बाबत गोपनियता राखणेबाबत सुचना देवून जाणेस सांगितले. त्याप्रमाणे मी निघून गेलो.

दि. 21.03.2025 रोजी 11.10 वा चे सुमारास मी पाटील साहेब यांना संपर्क करून श्री. साबळे, उप आयुक्त यांचा मला कोणताही निरोप अगर फोन आला नसल्याचे सांगितले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 कांबळे यांना श्री. साबळे उप-आयुक्त यांचेकडे पडताळणीकामी पाठवून त्यांचेकडून लाच रक्कम देणेची वेळ व ठिकाण निश्चित करण्याचे तसेच लाच रक्कम इतर कोणा इसमाकडे देणे संदर्भात चर्चा करणेकामी पाठवून पडताळणी करण्याचे निश्चित करून मला 15.00 वाजता बायपास रोड येथील वंदृावन मंगल कार्यालय येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी 15.25 वा चे सुमारास माझेकडील कार मधून वृंदावन गार्डन मंगल कार्यालय, सांगली येथे जावून पाटील साहेब व सापळा पथकाची भेट घेतली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती देवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले.त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 कांबळे यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.58 वाजता सुरु करून रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवून आम्हाला रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच नं.1 माझेकडील कारमधून महानगरपालिका कार्यालय सांगली येथे जावून साबळे साहेब यांची त्यांचे कक्षामध्ये भेट घेतली. त्यावेळी श्री. साबळे, उप-आयुक्त यांनी मला आमचे प्रलंबित कामा संदर्भात आयुक्त साहेबांशी पुन्हा एकदा बोलून त्यानंतर पुन्हा निरोप देत असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं.1 कांबळे तेथून रवाना होवून पाटील साहेब साहेब व सापळा पथक यांचेसमक्ष हजर झालो. त्यावेळी पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 17.03 वाजता काढून घेवून बंद केला.

त्यानंतर आम्ही वृंदावन मंगल कार्यालय येथे थांबून श्री. साबळे यांचा फोन येण्याची वाट पाहिली. परंतू त्यांचा फोन न आल्याने पाटील साहेब यांनी पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित केली. तसेच लोकसेवक श्री.साबळे यांचा मला निरोप अगर फोन आल्यानंतर त्यांचेविरूध्द पडताळणी व सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला श्री. साबळे, उप-आयुक्त यांचा फोन अगर निरोप आल्यानंतर त्यांचेकडून काही अवधी मागून घेवून तात्काळ त्यांना संपर्क करणेचे सुचना देवून कारवाई बाबत गोपनियता राखणेबाबत सुचना देवून जाणेस सांगितले. त्याप्रमाणे मी निघून गेलो.

दि. 28.03.2025 रोजी सकाळी 09.00 वा चे सुमारास मी पोलीस उप अधीक्षक श्री. पाटील साहेब यांना संपर्क करून श्री. साबळे, उप आयुक्त यांचा मला आजपर्यंत कोणताही निरोप अगर फोन आला नसल्याचे सांगितले. त्यावेळी पाटील साहेब यांनी आजरोजी मला व पंच नं.1 कांबळे यांना श्री. साबळे उप-आयुक्त यांचेकडे पडताळणीकामी पाठवून त्यांचेकडून लाच रक्कम देणेची वेळ व ठिकाण निश्चित करण्याचे तसेच लाच रक्कम इतर कोणा इसमाकडे देणे संदर्भात चर्चा करणेकामी पाठवून पडताळणी करण्याचे निश्चित करून मला 11.00 वाजता बायपास रोड येथील वंृदावन मंगल कार्यालय येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी 11.15 वा चे सुमारास वंृदावन मंगल कार्यालय येथे जावून पाटील साहेब व सापळा पथकाची भेट घेतली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी साबळे, उप-आयुक्त हे लाच रक्कम घेणेबाबत काहीएक निरोप देत नसले कारणाने मला व पंच नं.1 कांबळे यांना श्री. साबळे उप-आयुक्त यांचेकडे पडताळणीकामी पाठवून त्यांचेकडून लाच रक्कम



Scanned with OKEN Scanner

देणेची वेळ व ठिकाण निश्चित करण्याचे तसेच लाच रक्कम इतर कोणा इसमाकडे देणे संदर्भात चर्चा करणेकामी पाठवून त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती देवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 कांबळे यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 11.55 वाजता सुरु करुन रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवून आम्हाला रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच नं.1 कांबळे असे माझेकडील कारने रवाना होवून महानगरपालिका कार्यालय सांगली येथे जावून साबळे साहेब यांचेबाबत विचारणा केली असता साबळे साहेब हे जिल्हा परिषद जवळील मंगलधाम या महानगरपालिका कार्यालय येथे असलेचे समजल्याने मी व पंच नं.1 कांबळे तेथून रवाना होवून जिल्हा परिषद कार्यालय जवळील मंगलधाम या महानगरपालिका कार्यालय येथे जावून साबळे साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी श्री. साबळे, उप-आयुक्त यांनी मला त्यांचे प्रलंबित कामा संदर्भात जुन्या आयुक्त साहेबांना निरोप दिला असता त्यांनी कोणताही रिसपॉन्स दिला नसल्याचे सांगून नविन आयुक्त साहेबांशी भेट घेण्यास सांगितल्याने मी व पंच नं.1 कांबळे असे तेथून रवाना होवून पाटील साहेब व सापळा पथक यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.37 वाजता काढून घेवून बंद केला.

श्री. साबळे, उप आयुक्त यांनी मला त्यांचे प्रलंबित कामा संदर्भात नविन आयुक्त साहेब यांना भेटून कामाची पुर्तता करून घेण्यास सांगितले असल्याने, कार्यालयीन सुट्टी असल्याने पुढील आठवडयामध्ये नविन आयुक्त साहेब यांचेकडे पडताळणी करण्याचे पाटील साहेब यांनी सर्वानुमते निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला श्री. साबळे, उप-आयुक्त यांचा फोन अगर निरोप आल्यास तात्काळ आम्हास संपर्क करणेचे सुचना देवून कारवाई बाबत गोपनियता राखणेबाबत सुचना देवून जाणेस सांगितले. त्याप्रमाणे मी निघून गेलो.

दि.07.04.2025 रोजी पाटील साहेब यांनी मला संपर्क करून माझे प्रलंबित कामासाठी मला व पंच नं.1 कांबळे यांना नविन प्रभारी आयुक्त श्री.रविकांत अडसुळ यांचेकडे पाठवून पडताळणी करण्याचे निश्चित करून मला 12.00 वाजता बायपास रोड येथील वंृदावन मंगल कार्यालय येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी 12.30 वा चे सुमारास माझेकडील कार मधून वंृदावन गार्डन मंगल कार्यालय, सांगली येथे पाटील साहेब व सापळा पथक यांची भेट घेतली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी सर्वानुमते मला व पंच नं.1 कांबळे यांना सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकाचे प्रभारी आयुक्त श्री.अडसुळ यांचेकडे पाठवून त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती देवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 कांबळे यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.04 वाजता सुरु करुन रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवून आम्हाला रवाना करून पडताळणी कारवाई केली असता, झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये, श्री. अडसुळ, प्रभारी आयुक्त यांनी माझेशी आमचे प्रलंबित कामाबाबत चर्चा करून त्यांचेकडे चार्ज तात्पुरता असल्याचे सांगून फाईल नियमानुसार  असेल तर ती मंजूर करीत असल्याचे सांगून माझ्याकडे कोणत्याही प्रकारची लाचेची मागणी केली नसल्याचे निष्पन्न झाले.

त्यावेळी मी पाटील साहेब यांना साबळे, उप-आयुक्त हे आमचे प्रलंबित बांधकाम परवान्याची फाईल मंजूर झालेनंतर माझेकडे पैशाची मागणी करण्याची शक्यता असल्याचे सांगितले. त्यावेळी पाटील साहेब यांनी सर्वानुमते श्री. साबळे, उप-आयुक्त यांचा मला निरोप येण्याचा तसेच आमचे प्रलंबित बांधकाम परवाना मंजूर झाल्यानंतर पुन्हा श्री. साबळे, उप-आयुक्त यांचेविरूध्द पडताळणी कारवाई करून त्यानंतर पुढील सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला श्री. साबळे, उप-आयुक्त यांचा फोन अगर निरोप आल्यास तात्काळ संपर्क करणेचे सुचना देवून कारवाई बाबत गोपनियता राखणेबाबत सुचना देवून जाणेस सांगितले. त्याप्रमाणे मी निघून गेलो.

दि.15.04.2025 रोजी मी पोलीस उप अधीक्षक पाटील साहेब यांना संपर्क करून आमची प्रलंबित बांधकाम परवान्याची फाईल मंजूर झाली असल्याचे सांगून आता साबळे, उप-आयुक्त हे माझ्याकडून लाच रक्कम स्विकारू शकतात असे कळविले. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला दुपारी 12.00 वा बायपास रोड येथील वंृदावन मंगल कार्यालय येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी 12.30 वा चे सुमारास माझेकडील कार मधून वंृदावन गार्डन मंगल कार्यालय, सांगली येथे पाटील साहेब व सापळा पथक यांची भेट घेतली. त्यावेळी पाटील साहेब यांनी सर्वानुमते मला व पंच नं.1 कांबळे यांना श्री.साबळे, उप आयुक्त यांचेकडे पाठवून त्यांचे भेटीचे तसेच लाच रक्कम देणेची वेळ व ठिकाण निश्चित करून पडताळणी कारवाई करून त्यानंतर पुढील सापळा कारवाई करण्याचे निश्चित



Scanned with OKEN Scanner

केले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती देवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 कांबळे यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.28 वाजता सुरु करुन रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवून आम्हाला रवाना करून पडताळणी कारवाई केली असता, झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये, श्री. साबळे, उप-आयुक्त यांनी मला ऑफीस संपलेनंतर सांगली कोल्हापूर रोड येथील हॉटेल के लॉन्ज येथे भेटणेचे निश्चित करून सोबत येताना आर्की.चव्हाण सर यांना घेवून येण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी कार्यालयीन वेळ संपलेनंतर 18.00 वा उद्योग भवन, विश्रामबाग सांगली येथील सरस्वती नगर स्पोट्र्स ग्राऊंड येथून श्री. साबळे, उप-आयुक्त यांचेविरुध्द पडताळणी व पुढील सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला 18.00 वा उद्योग भवन विश्रामबाग सांगली येथील सरस्वती नगर स्पोट्र्स ग्राऊंड येथे आर्की.चव्हाण सर यांना घेवून हजर राहणेच्या सुचना देवून जाणेस सांगितले. त्याप्रमाणे मी निघून गेलो.

त्यानंतर 18.45 वा चे सुमारास मी माझेकडील कारने सोबत आर्की. रविंद्र चव्हाण सर यांना घेवून उद्योग भवन विश्रामबाग सांगली येथील सरस्वती नगर स्पोर्ट्स ग्राऊंड येथे पाटील साहेब व सापळा पथक यांचे समक्ष हजर झालो. त्यानंतर साबळे साहेब यांनी माझेसोबत हॉटेल के लॉन्ज येथे जेवण करण्याची तयारी दर्शविल्याने सदर ठिकाणी ते माझ्याकडून लाच रक्कम मागणी करून स्विकारण्याची शक्यता असल्याने पाटील साहेब यांनी सर्वानुमते साबळे, उप-आयुक्त यांचेविरुध्द सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी दि.11.03.2025 रोजीचे कारवाईवेळी मी हजर केलेले 5,00,000/- रूपये रक्कम आहे त्यामध्ये 500/- रूपये दराच्या 1000 नोटा व 500/- रूपये दराचे 400 डमी नोटा असे एकुण 2,00,000/- रूपये असे एकुण 7,00,000/- रूपये वापरण्याचे निश्चित करून सदरची रक्कम पाटील साहेब यांनी दोन्ही पंचां समक्ष हजर केली. त्यानंतर पाटील साहेब यांनी 500/- रूपये दराच्या 5,00,000/- रूपये नोटांचे नंबर्स व दि.11.03.2025 रोजीचे कारवाईवेळी को-या कागदावर लिहून ठेवलेल्या नोटांचे नंबर्सची दोन्ही पंचासमक्ष पडताळणी केली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी सापळा कारवाईची वेळ निश्चित करण्यासाठी माझे मोबाईल नंबर 9337111777 वरून 19.24 वा चे सुमारास श्री. साबळे यांचे मोबाईल नंबर 9766799390 वर कॉल करून पडताळणी कारवाई केली असता, आमचेमध्ये आठ-सव्वा आठ पर्यंत हॉटेल के लॉन्ज येथे भेटणेचे निश्चित झाले.

त्यानंतर सापळा कारवाईच्या सोईकरीता आम्ही सर्व आमचेकडील वाहनाने उद्योग भवन येथील सरस्वती स्पोर्ट्स ग्राऊंड येथून 19.40 वा चे सुमारास रवाना होवून 19.55 वाजता विष्णुआण्णा फळ मार्केट येथे सुरक्षित ठिकाणी दाखल झालो.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार पोना/चौगुले यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर 7,00,000/-रुपये लाचेचे रकमेचे एकुण 14 नोटांचे बंडल (प्रत्येक बंडलमध्ये 50,000/- रूपये प्रमाणे) असे रब्बरच्या सहयाने एकत्रित करून ती एका वर्तमान पेपर मध्ये गुंडाळून सदर वर्तमान पेपरच्या दोन्ही बाजूस अँथ्रासीन पावडर एक सारखी लावली. त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे पोना/चौगुले यांनी 7,00,000/- रुपये लाच रकमेचा नोटांचा बंडल माझे सोबत असले निळया रंगाचे सॅकमधील दोन नंबरचे कप्प्यामध्ये श्री. साबळे, उप-आयुक्त यांनी मागणी केल्यानतर देण्यासाठी ठेवली. त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे पोना/चौगुले यांनी त्यांचे दोन्ही हात साबण व पाण्याने स्वच्छ धुवून ते सापळा पथकामध्ये सामील झालेत. त्यानंतर पाटील साहेब यांनी इतर सापळा पुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी श्री. साबळे, उप-आयुक्त यांचेविरुध्द हॉटेल के लॉन्ज येथे सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती देवून रेकॉर्डरमधील पडताळणी कारवाईवेळचे मेमरीकार्ड बाहेर काढून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला, पंच नं.1 कांबळे, आर्की.चव्हाण सर व सापळा पथक यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 20.23 वाजता सुरु करून रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी, पंच नं.1 कांबळे व आर्की.चव्हाण सर असे माझेकडील हुंडाई व्हेन्यु कार क्र. एमएच 10 डीएल 7771 मधून रवाना होवून सांगली कोल्हापूर रोड येथील हॉटेल के लॉन्ज येथील पार्किंगमध्ये दाखल झालो. पाटील साहेब व सापळा पथक हे देखील त्यांचेकडील खाजगी कारने आमचे पाठोपाठ आलेचे दिसले.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर मी माझे मोबाईलवरून साबळे साहेब यांना फोन करून आम्ही हॉटेल येथे आलो असल्याचे सांगितले. त्यावर साबळे साहेब यांनी ते हॉटेल येथे येत असल्याचे सांगितले. त्यानंतर मी, पंच नं.1 कांबळे व आर्कि.चव्हाण सर असे कारमधून उतरून हॉटेलमध्ये जावून बसलो. त्यावेळी माझे सोबत लाच रक्कम ठेवलेली निळ्या रंगाची सॅक होती. त्यावेळी मी व आर्की.चव्हाण सर असे एका टेबलवर व पंच नं.1 कांबळे हे आमचे बाजूस असले टेबलवर बसले. त्यानंतर काही वेळाने साबळे साहेब हे देखील त्यांचे ड्रायव्हरसह हॉटेल येथे येवून आमचे टेबलला बसले. त्यावेळी त्यांचा ड्रायव्हर हा दुसरे टेबलवर बसला. त्यावेळी मी, आर्की.चव्हाण सर व श्री. साबळे, उप-आयुक्त असे जेवण करीत चर्चा करीत बसलो. त्यावेळी साबळे साहेब यांनी मी महानगरपालिका येथील मकानदार यांचेविरूध्द केले कारवाईचा विषय काढून त्याबाबत चर्चा केली. त्यानंतर आमचे जेवण झालेनंतर मी, आर्की.चव्हाण सर व साबळे असे बाहेर येवून पार्किंगमध्ये येवून बोलत थांबलो. त्यावेळी माझे सोबत लाच रक्कम ठेवलेली निळ्या रंगाची सॅक होती. त्यावेळी मी साबळे साहेब यांना "दोन मिनिट" असे म्हणून साईडला बोलावून हातामधील सॅक दाखविली. त्यावर साबळे साहेब यांनी मला "न्हाय न्हाय.... आत्ता कायच नको .. न्हाय न्हाय आपल काम होण महत्वाच हाय.... न्हाय न्हाय .... आत्ता कायच नको .. न्हाय न्हाय आपल काम होण महत्वाच हाय....एवढया लेट झालय...आत्ता नको नंतर" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "तुम्ही शब्द पाळलेला हाय" असे म्हणालो. त्यावर साबळे साहेब यांनी "हे सरांकड ठेवा लागेल त्यावेळी उधार घेईन त्यांच्याकडन" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "न्हाय न्हाय तस नको.....सर असतात नसतात माझ्यावर जबाबदारी नको मी महिना घेवुन फिरालोय काय सांगु तुम्हाला" असे म्हणालो. त्यावर साबळे साहेब यांनी "सरांकड दया.....ठेवा मला लागेल त्यावेळी उधार घेतो मी त्यांच्याकडण काय विषय न्हाय राहुदे त्यांच्याकड" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "दोन मिनीट फक्त लगेच किंवा ड्रायव्हरला पाच मिनीट थांबवा" असे म्हणालो असता साबळे साहेब यांनी "नंतर बघुया.... आज न्हाय... आज न्हाय...नंतर कधीही... मी लागेल त्यावेळी मी तुम्हाला सांगतो आत्ता तर काय गरज न्हाय आपल काम होण महत्वाच" असे म्हणून ते त्यांचे पांढरे रंगाचे स्विफ्ट कार क्र.एमएच 12 एमबी 7091 मधून हॉटेल के लॉन्ज येथून ड्रायव्हर सह निघून गेले. त्यानंतर मी, पंच नं.1 कांबळे व आर्की. चव्हाण सर असे हॉटेल येथून माझेकडील कारने रवाना होवून सांगली कोल्हापूर रोडलगत असले विष्णु आण्णा फळ मार्केट येथे दाखल झालो. त्यावेळी पाटील साहेब व सापळा पथक असे त्यांचेकडील खाजगी कारने आमचे पाठोपाठ दाखल झालेत. त्यावेळी पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 21.56 वाजता काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला.

त्यानंतर पाटील साहेबांनी मला व पंच नं.1 विशाल कांबळे यांना सापळा कारवाईची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन झालेल्या संभाषणाची पंचांसमक्ष खात्री केली. झाले एकंदरीत सापळा कारवाईमध्ये, श्री. साबळे उप-आयुक्त यांनी माझेकडून लाच रक्कम स्विकारली नसून त्यांनी मला लाच रक्कम आर्की.चव्हाण यांचेकडे ठेवण्यास सांगून त्यांना लागेल त्यावेळी ते चव्हाण यांचेकडून मागून घेत असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी सर्वानुमते सापळा कारवाई तात्पुरती स्थगित केली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला श्री. साबळे, उप-आयुक्त यांचा निरोप आल्यानंतर त्यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते निश्चित करून माझेकडील निळ्या रंगाची सॅक व त्यामधील अॅन्थ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम 7,00,000/- रूपये त्यांचे ताबेत घेतले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला श्री. साबळे, उप-आयुक्त यांचा निरोप अगर फोन आल्यास तात्काळ संपर्क करणेबाबत सुचना देवून कारवाई बाबत गोपनियता राखणेबाबत सुचना देवून जाणेस सांगितले. त्याप्रमाणे मी व आर्की. चव्हाण असे निघून गेलो.

दि. 19.05.2025 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री. पाटील साहेब यांनी मला संपर्क करून साबळे उप-आयुक्त यांचा फोन अगर निरोप आला आहे का? याबाबत विचारणा केली असता मी पाटील साहेब यांना साबळे साहेब यांचा मला आजपर्यंत कोणाताही फोन अगर निरोप आला नसल्याचे सांगितले. तसेच मी त्यांना साबळे, उप-आयुक्त यांची दुपारी 01.30 वा चे सुमारास मी कामानिमीत्त महानगरपालिका कार्यालयात गेलो असता तेथे भेट झाली त्यावेळी साबळे साहेब यांनी आमचे मंजुर बाधंकाम परवान्याबाबत तसेच पैशाबाबत कोणतीही चर्चा केलेली नाही. तसेच सुमारे 10 ते 12 दिवसापुर्वी देखील मी कामानिमीत्त महानगरपालिका कार्यालयात गेलो असता त्यावेळी देखील साबळे साहेबांची भेट झाली होती त्यावेळी देखील साबळे साहेब यांनी माझ्याकडे पैशाबाबत कोणतीही चर्चा केलेली नाही. तरी साबळे साहेब हे आता माझ्याकडे पैशाची मागणी करून माझ्याकडून लाच रक्कम स्विकारणार नाहीत याची मला खात्री वाटत असल्याचे सांगितले. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला एसीबी कार्यालयात बोलावून घेवून माझा सविस्तर जबाब दोन्ही पंचांसमक्ष नोंदविला आहे. तसेच पाटील साहेब यांनी मला मी सापळा कारवाईवेळी हजर केलेले 500/- रूपये दराच्या चलनी नोटा एकुण 5,00,000/- रूपये व निळ्या रंगाची सॅक मला परत दिली आहे.

तरी दि. 25.02.2025 रोजीचे 16.24 वा ते 16.51 वा च्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.

वैभव साबळे, उप-आयुक्त, वर्ग-1 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांनी मार्केट यार्ड सांगली जवळील वसंतदादा पाटील आयुर्वेदिक कॉलेजकडे जाणारे रोड येथील हॉटेल देवगिरीच्या समोरील रोडवर त्यांचे कारमध्ये आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने आमचे कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या 24 मजली इमारतीचा बांधकाम परवाना वरिष्ठांना सांगून मंजुर करण्याकरीता स्वत: करीता माझेकडे 10,00,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 7,00,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे म्हणून माझी श्री. वैभव विजय साबळे, उप-आयुक्त, वर्ग-1 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका, वय-31 वर्षे, रा. ग्रिन एकर्स, फ्लॅट नं.403, धामणी रोड सांगली यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील वर्दी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंटआउट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

chetan nathuram mane

**Rank (पद):** I (Inspector) **No.(क्र.):** DGPCNMM8901

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SUDHIR GULCHAND
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PSMH26817

पोलीस स्टेशन ऑफिसर,
विश्रामबाग पोलीस स्टेशन, सांगली

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with OKEN Scanner